Peer Reviewed

ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly- Vol.5 • Issue 1 • 15 Dec.2019 - 14 Mar. 2020 • Rs.100/

*International*
*Interdisciplinary Multilingual Research Journal*

Editor
Dr. Kailas G.Kaninde

# INDEX


| SR. NO. | PAPER TITLE | AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 01 | USE OF ICT IN TEACHING AND LEARNING: A CRITICAL ANALYSIS | Dr. Kailas Kaninde | 01 |
| 02 | CHALLENGES OF USING ICT IN HIGHER EDUCATION | Dr.S.S.Jadhav | 05 |
| 03 | "Study of Indian society in Arundhati Roy's Work." | RAIBHOLE PRADIP MAROTIRAO | 09 |
| 04 | The white Tiger: A critical study of Arvind Adiga's view on religion | Parmeshwar Tukaram Mupade | 15 |
| 05 | हिंदी के समस्या–नाटको का उद्भव और विकास | श्री. नानासाहेब रामदास चोरमले | 18 |
| 06 | तृतीयपंथी समुदायाचा राजकीय दृष्टिकोन : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. कैलास कानिंदे | 21 |
| 07 | वैदू आणि नंदीवाला या जमातीची शिक्षण विषयक स्थिती | प्रा.डॉ.बी.आर.भोसले | 25 |
| 08 | जुन्नर नगर परिषदेची ऐतिहासीक संरचना | प्रा.डॉ. राहुल पंडित | 29 |
| 09 | शिक्षणातील नऊ पंचशील तत्वे | प्रा.डॉ. राजू श्रावण मोतेराव | 34 |
| 10 | कौटुंबिक हिंसा | प्रा.एडके प्रदिप माधवराव | 42 |
| 11 | बहूजन समाज पक्षाच्या उद्याची पार्श्वभूमी : एक अभ्यास | प्रा. डॉ. विशाल रावसाहेब पंतगे कांबळे तेजस देवबाराव | 45 |
| 12 | महामानवाने घडवलेल्या समाजाच्या राजकीय अस्तित्वाला घरघर | भैय्यासाहेब तुकाराम गोडबोले | 48 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मूकनायक | प्रा.डॉ.जाधव ज.तु. | 52 |
| 14 | भारतीय समाजव्यवस्थेत दलितांचे स्थान | प्रा.डॉ.कृष्णा शेडे राजू दत्तात्रय पंडित | 56 |

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मूकनायक

**प्रा.डॉ. जाधव ज.तु.**
मराठी विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर जि.नांदेड

**प्रस्तावना**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडकर हे क्रांतिकारी समाजसुधारक, प्रकांडपंडित, महान शिक्षणतज्ज्ञ, श्रेष्ठ ज्ञानयोगी, अस्पृश्यांचे उद्धारक, परिवर्तनाचे अग्रदूत, अस्पृश्य, उपेक्षित व वंचितांच्या सर्वस्पर्शी कल्याणासाठी ध्येयवादाने झपाटलेले ते लोकपत्रकार होते. मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांतून बाबासाहेबांनी अस्पृश्यांना मानवमुक्तीची दीक्षा दिली. एक निर्भीड लोकपत्रकार म्हणून त्यांची वाणी व लेखणी ही आयुष्यभर विषमतेविरुद्ध लढा देत संघर्ष केली. अस्पृश्य, शोषित व वंचित माणसांना वेदनामुक्त, दुःखमुक्त व गुलामीमुक्त करण्यासाठी त्यांनी आपल्या प्रेरक पत्रकारितेचा निर्भीडपणाने वापर केला. प्रामुख्याने बाबासाहेबांच्या एकंदरीत पस्तीस वर्षाच्या पत्रकारितेची कारकीर्द स्पष्टपणे जाणवते. बाबासाहेबांच्या पत्रकारितेमध्ये लोककल्याणाची उदात्त जाणीव व तळमळ आहे. वृत्तपत्राचे ऋण हे लौकीक ऋण आहेत, अशी त्यांची स्पष्ट धारणा होती. सामाजिक प्रबोधन व सामाजिक न्याय हा त्यांचा आग्रह होता. लोकप्रबोधन, लोकशिक्षण, लोकहित, लोककल्याण व लोकउत्कर्ष ही त्यांच्या ध्येयवादी पत्रकारितेची पंचसूत्रे होती. विषमतावादी वर्णव्यवस्थेला धक्के देणारी बाबासाहेबांची पत्रकारिता होती. गुलामगिरी नाकारून वंचित माणसांना बुद्धिवादाची प्रेरक शक्ती, ऊर्जा व प्रेरणा देणारी बाबासाहेबांची पत्रकारिता होती. तत्कालीन जातियवादी मराठी पत्रकारितेने जाणीवपूर्वक बेदखल केलेली बाबासाहेबांच्या 'मूकनायका'ची पत्रकारिता ही खऱ्या अर्थाने क्रांतिकारी मानवमुक्तीची पत्रकारिता होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांच्या तत्त्वावर आधारलेली वैश्विक मानवतेची ही पत्रकारिता आहे. बाबासाहेबांच्या 'मूकनायक' मधील पत्रकारितेच्या प्रत्येक शब्दा-शब्दात दुःखमुक्तीची भाषा आहे. गुलामगिरी व वेठबिगारीच्या मुक्तीची भाषा, वेदनेची भाषा आहे आणि पर्यायाने सर्व जाती, धर्म, पंथ यासारख्या सर्व संप्रदायातील माणसांना स्वाभीमानाचे 'माणूस' म्हणून जगता यावे, यासाठी त्यांची पत्रकरिता विद्रोह व आक्रोशाची आग ओकतांना दिसून येते.

**मूकनायकचा प्रारंभ**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लोकपत्रकरितेची प्रेरणा ही प्रामुख्याने ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांपासून घेतल्याचे जाणवते. तत्कालीन ब्राह्मणांची वृत्तपत्रे ही अस्पृश्यांच्या अन्याय व अत्याचाराची दखल घेत नव्हती, म्हणून बााबसाहेबांनी कोणतीही राजकीय भूमिका न घेता केवळ सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेने प्रेरीत होऊन त्यांनी 'मूकनायक'च्या माध्यमातून आपल्या निर्भीड पत्रकारितेचा प्रारंभ केला. बाबासाहेबांनी दि. २८ ऑक्टोबर, १९५४ रोजी मुंबईच्या पुरंदरे स्टेडियमवर दिलेल्या भाषणात म्हणतात की, ''बुद्ध, कबीराप्रमाणेच आपण म. फुले यांनाही गुरू मानतो, कारण ब्राह्मणेत्तरांचे खरे गुरू तेच होत. शिंपी, कुंभार, न्हावी, कोळी, महार, मांग, चांभारांना माणुसकीचे धडे फुल्यांनीच दिले आणि शिकविले. पूर्वींच्या राजकारणात आम्ही ज्योतिबाच्या मार्गानेच जात होतो... कोणी कोठेही जावोत; पण आम्ही मात्र ज्योतिबांच्याच मार्गाने जाऊ.''

यावरून बाबासाहेबांनी 'दीनमित्र' व 'शेतकऱ्यांच्या कैवारी' यासारख्या अनेक ब्राह्मणेत्तर नियतकालिके वा वृत्तपत्रांकडून ते पत्रकारितेच्या विश्वाकडे प्रेरीत झाले होते.

'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक शनिवार, दि. ३१ जानेवारी १९२० रोजी प्रकाशित झाला. अस्पृश्य समाज गेल्या शेकडो वर्षांपासून अमानवीय जीवन जगत होता. अशा 'मूक' समाजाचे 'नायकत्व' म्हणजे 'मूकनायक' होय. मूकनायकच्या शीर्षकाखाली बाबासाहेबांनी संत तुकारामाच्या अभंगाच्या ओळी बिरुदावली म्हणून मुद्रित केल्या आहेत. त्या अभंगातील चरणे पुढीलप्रमाणे आहेत.

काय धरूं आतां धरूनियां भीड ।
निःशंक हे तोंड वाजविलें ।।
नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण ।
सार्थक लाजून नव्हे हित ।।

संत तुकारामाची गाथा वगळता मराठीच्या ज्या काल्पनिक साहित्यात मानवी संवेदना व मूल्य नाही ते साहित्य समुद्रात फेकून दिले, तरी समाजाचे काहीही नुकसान होणार नाही, इतकी दाहक वास्तवता संत तुकारामाच्या अभंगात जाणवते. म्हणूनच बाबासाहेबांनी आपल्या मूकनायकामध्ये संत तुकारामांच्या या ओव्यांचा शेवटच्या अंकापर्यंत बिरुदावली म्हणून वापर केला आहे. 'मूकनायक' शीर्षकाच्या उजव्या बाजुला जाहिरातीचे दर तर शीर्षकाच्या डावीकडे टपालासह वार्षिक वर्गणीचे दर छापले आहेत. पहिल्या अंकातील अग्रलेख 'मनोगत' या शीर्षकाखाली प्रकाशित झाला आहे. हा देश विषमतेचे माहेरघर आहे. हिंदूधर्मीयात असलेली ही विषमता जितकी अनुपम आहे, तितकीच ती निंदास्पदही आहे. सत्ता न ज्ञान नसल्यामुळे ब्राह्मणेत्तर मागासलेले व त्यांची उन्नती खुंटली हे निर्विवाद आहे, असे सांगून बाबासाहेबा आपल्या अग्रलेखात पुढे म्हणतात, ''आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास, तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु, मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे न्याहाळून पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट जातींचे हिसंबंध पाहणारी आहेत. इतर जातींच्या हितांची त्यांना परवा नसते.'' यावरून बाबासाहेबांची स्वार्थी व स्वलाभी पत्रकारितेला लाथाडून सर्वसमावेशक 'सर्वजनहितकारी' पत्रकारितेचा प्रारंभ केला. पहिल्याच अंकाच्या अग्रलेखातील तर्कशुद्ध विचार, उपमा व अलंकारांच्या वापरातून बाबासाहेबांच्या अंतःकरणातील सामाजिक तळमळची भावना स्पष्टपणे जाणवते.

**'मूकनायक' मधील अग्रलेख**

दि. ३१ जानेवारी १९२० ते दि. २३ ऑक्टोबर १९२० पर्यंतच्या या काळातील 'मूकनायक' पाक्षिकाचे एकूण एकोणीस अंक प्रकाशित झाले आहेत. मूकनायकाच्या प्रत्येक अंकात अग्रलेख प्राधान्याने प्रकाशित झाले आहेत. या एकोणवीस अंकातील अग्रलेखकांचे शीर्षक पुढीलप्रमाणे आहेत. मनोगत, स्वराज्याची सर सुराज्याला नाही!, हे स्वराज्य नव्हे, हे तर आमच्यावर राज्य, स्वराज्यातील आमचे आरोहण, राष्ट्रातील पक्ष, अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद नागपूर, काकगर्जना, सिंहप्रतिबिंब, दास्यावलोकन, मागून आलेले लोण पुढे पोचविणे, आमचा संदेश, उन्नतीचे साधन, हिंदी राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा. मूकनायकच्या या अग्रलेखांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक यासारख्या परिस्थितीचे वस्तुनिष्ठ लेखन केले आहे. आपल्या अग्रलेखांतून बाबासाहेबांनी भारतातील

बहिष्कृत समाजाला सातत्याने जागृतीची हाक दिली. ज्ञानाची दिक्षा दिली. 'आमचा संदेश' या अग्रलेखातून बहिष्कृत वर्गाने एकदिलाने व एकजुटीने हीनदीन जातीबंधूता उन्नतीच्या मार्गावर घेऊन जाण्याचा संदेश देतात. राष्ट्रहित, समाजहित व मातृभूमीच्या उद्धारासाठी झटल्यास आपल्या जन्माचे सार्थक होईल. आपले पूर्वज हे भांडवलदार नव्हते किंवा त्यांची काहीही कीर्ती नव्हती, तेव्हा आपण परिस्थितीशी संघर्ष करून त्यातून मार्ग काढीत स्वतःचा व आपल्या अनुयायांचा उद्धार करावा. आपल्या उद्धारासाठी कोणताही महात्मा प्रकट होणार नाही. तुम्हाला अशक्त पाहून तोच महात्मा तुम्हाला उचलून नेईल. आपण आपल्या पूर्वजांकडून अनेक अनिष्ठ रूढी–परंपरेच्या दुष्टचक्रात अडकून पडलो आहोत, तेव्हा आपण सर्वांनी समाजाला त्या दुष्टच्रकातून मुक्त करा. थकलेल्या, भूकेल्या व झोपी गेलेल्या माणसांच्या अंतःकरणात जाऊन त्यांना हलवून जागे करा. याकडे तुम्ही दुर्लक्ष केलात, तर भावी पिढीच्या उन्नतीचा तुम्हीच खून केलात म्हणून समाज तुम्हाला दोष देईल, असा बाबासाहेबांनी बहिष्कृत बंधुभगिनींना संदेश दिला आहे. 'उन्नतीचे साधन' या अग्रलेखनात ते म्हणतात, ''बहिष्कृत म्हणजे बेअकली, त्यांना बुद्धीच नाही, त्यांच्यात विद्येचा प्रसारच होणार नाही, अशा भ्रामक कल्पना सोडून खऱ्या राष्ट्रीय प्रेमाने आजचे पुढारी जर त्यांच्याकडे दयार्द्र दृष्टीने पाहतील, तर त्यांना मनुष्याची बुद्धी ही प्रथम एखाद्या संगमरवरी दगडासारखी असते हे तेव्हाच दिसून येईल'' हिंदू समाजातील स्वार्थी व धूर्त लोकांनी दूर लोटल्यामुळे बहिष्कृत समाज हा एखाद्या जलाशयाच्या बाहेर पडलेल्या माशाप्रमाणे तडफडतो आहे. राष्ट्रीय ऐक्याच्या या वृक्षाशिवाय हिंदी राष्ट्राचे भाग्य उदयाला नेणार नाही, म्हणून शिक्षण हेच आपल्या खऱ्या उन्नतीचे साधन असल्याचा स्पष्ट विचार त्यांनी या अग्रलेखनातून व्यक्त केला आहे.

मूकनायकच्या शेवटच्या अंकातील 'हिंदी राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा' या अग्रलेखातून बहिष्कृत समाजाला आपल्या साहसी शौर्याची व पराक्रमाची आठवण करून दिली आहे. अन्याय किती दिवस सहन करणार? आपले हक्क सरकारच्या कानावर घाला. आपल्या नैसर्गीक हक्कासाठी कुणालाही घाबरू नका. उन्नतीच्या मार्गात दुःख हे भोगावेच लागतात. घाबरून पळ काढण्यात पुरुषार्थ नसतो. आपल्या कुळाच्या अभिमानाने क्रांतीचा झेंडा फडकविण्याची हीच वेळ असल्याचे सांगून ते पुढे म्हणतात, ''ज्या समाजात आपण लहानाचे मोठे झालो, त्या समाजाच्या हिताकरिता, ज्या देशांत जन्मास आलों व वाढलों त्या मातृभूमीच्या उद्धारार्थ व तिच्या ऋणांतून अंशतः तरी मोकळे होण्यास्तव ही आपली नाशिवंत काया झिजवा व आपली कीर्ती अमर करा. 'नर करणी करेगा तो नारायण बन जायगा' ही म्हण सतत मनात ठेवून, सामर्थ्य आहे चळवळींचे, जो जो करील त्यांचे, या समर्थांच्या उपदेशाप्रमाणे वागा आणि आपल्या पुढारलेल्या बंधूंस शरमवून टाका.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढील शिक्षणासाठी लंडनला जाण्यापूर्वी 'मूकनायक' चे संपादक म्हणून पांडुरंग नंदराम भटकर यांच्यावर जबाबदारी सोपवून त्यांनी दि. ५ जुलै १९२० रोजी मुंबई सोडली. पांडुरंग भटकर व मूकनायकाच्या व्यस्थापक मंडळामध्ये समन्वय टिकून राहिला नाही. त्यामुळे 'मूकनायक'चे दुसरे संपादक म्हणून व्यवस्थापक मंडळाने ज्ञानदेव घोलाप यांच्यावर जबाबदारी सोपविली होती. ज्ञानदेव घोलप यांनीही 'मूकनायक' ची काळजी घेतली नाही. 'मूकनायक' वर ते स्वतःची मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी व्यवस्थापक मंडळाशी वाद घालीत होते. वादाचा परिणाम म्हणून 'मूकनायका'वर कर्जाचा बोजा वाढल्याने अखेर मुकनायकचे प्रकाशन बंद झाले. मूकनायकाचे बंद झालेले प्रकाशन व घोलपांनी घातलेल्या वादामुळे बाबासाहेबांना प्रचंड दुःख झाले होते. बहिष्कृत समाजाच्या हितासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' च्या माध्यमातून आपल्या तेजस्वी लोकपत्रकारितेचा प्रारंभ केला होता. बाबासाहेबांनी

'मूकनायक'ची जबाबदारी प्रथम पांडुरंग भटकर व त्यांनतर पुढे व्यवस्थापक मंडळाच्या सल्ल्याने ज्ञानदेव घोलप यांच्या दर टाकली होती, परंतु, या दोघांनाही बाबासाहेबांचा विश्वासघात केल्याचे दिसते. त्यातच ज्ञानदेव घोलपांनी वाद निर्माण करून बाबासाहेबांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नांचा खून केला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायकाच्या लेखनातून बहिष्कृत समाजावरील अन्यायाची झाडाझडती घेतली आहे. बाबासाहेबांचे अग्रलेख हे भारतीय पत्रकरितेला युगानुयुगे मार्गदर्शन करणारे आहेत. त्यांच्या पत्रकारितेत सत्यता, स्पष्टता व निर्भिडपणा आहे. बाबासाहेब हे विचारसंघर्षाला कधीही डगमगले नाहीत. बाबासाहेबांनी आपल्या पत्रकारितेतून वाचकांना लोककल्याणाच्या तळमळीची दृष्टी दिली. अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी संघर्षाचे धाडस दिले. जात व धर्मभक्तीपेक्षा देशभक्तीचा सर्वश्रेष्ठ चष्मा दिला. 'मूक' समाजाचे नायक होण्याचे आत्मभान दिले. बाबासाहेबांच्या मूकनायक पाक्षिकांचे अंक हे तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व राष्ट्रीय ऐतिहासिक दस्ताऐवज आहेत. मूकनायकमधील बाबासाहेबांची भूमिका ही केवळ संपादक वा पत्रकार एवढ्यापुरतीच मर्यादित राहिलेली नसून ती प्रखर बुद्धीवादी, व्यासंगी अभ्यासक, संशोधक, राष्ट्रीय व समाजहित जोपासणारा देशभक्त असल्याचे पदोपदी जाणवते.

**निष्कर्ष**

१.मूकनायकमधील बाबासाहेबांच्या अग्रलेखांची भाषा ही साधी व सोपी असली, तरी ती परखड, स्पष्ट, मार्मिक व विचारप्रवर्तक आहे.

२.बाबासाहेबांनी मूकनायकातील अग्रलेखांमध्ये संतांची वचने, म्हणी, दृष्टांत व उपमा अशा भाषिक सौंदर्याचा प्रभावीपणाने वापर केला आहे.

३.बाबासाहेबांच्या पत्रकरितेचा केंद्रबिंदू हा प्रामुख्याने सामाजिक व राष्ट्रीय विषयांचा असून स्त्री–पुरुष समानता, कामगार, समता, सामाजिक न्याय व माणसांच्या प्रतिष्ठेसाठीही त्यांची लेखणी झपाटलेली होती.

४.बाबासाहेबांची पत्रकारिता ही मानवी मूल्यांचा मानदंड आहे. विषमतेचा धिक्कार करीत त्यांनी बुद्धिवादी, न्यायसंगत व ज्ञानधर्मी लोकपत्रकारिता केली.

५.मूकनायकमधील बाबासाहेबांचे अग्रलेख हे बहिष्कृत समाजातील माणसांना स्वयंप्रकाशाची, स्वाभीमानाची, मानवतेची, समाज व राष्ट्रहिताची जाणीव देणारे आहेत.

६.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रचंड उच्चविद्याविभूषीत असूनही त्यांनी मराठी लोकभाषेत आपली पत्रकारिता करून भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात आपल्या लोकपत्रकारितेच्या पर्वाचा आदर्श निर्माण केला आहे.

७.बाबासाहेबांच्या मूकनायकाने बहिष्कृत समाजातील शोषितांचे दुःख, वेदना, अपमान, गुलामगिरी चव्हाट्यावर आणून त्यांना आत्मोद्धार, आत्मनिर्भरता व आत्मभानाचे अचूक दिशादिग्दर्शन केले.

८.बाबासाहेबांची पत्रकारिता ही वर्ग व वर्णाचा विचार न करता भारतीय समाजाच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी युगपरिवर्तनशील अशीच त्यांची लोकपत्रकारिता होती.

**संदर्भग्रंथ**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, द्वितीय आवृत्ती, २००८.